# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:27.12.2024** **वारःशुक्रवार**

---

1. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या हस्ते राष्ट्रीय बाल पुरस्कार प्रदान, महाराष्ट्रातील दोन मुलींचा समावेश
2. सरकारी धोरणांमध्ये तरुणांच्या सक्षमीकरणाला सर्वाधिक प्राधान्य पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
3. माजी पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांचं निधन, सात दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर
4. देशातील बँकांच्या नफ्यात सलग सहा वर्षं वाढ, थकीत कर्जात घट आणि
5. बॉर्डर-गावस्कर क्रिकेट मालिकेच्या मेलबर्न कसोटीत ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावात सर्व बाद 474 धावा

**बाल पुरस्कार**

असाधारण कामगिरी करणाऱ्या 17 बालकांना कालच्या वीर बाल दिनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या हस्ते नवी दिल्लीत प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारानं गौरवण्यात आलं. शीख धर्मियांचे दहावे गुरू, गुरू गोविंदसिंग यांचे दोन पुत्र, बाबा जोरावरसिंग आणि बाबा फतेहसिंग यांच्या हौतात्म्याचं स्मरण म्हणून हा दिवस पाळला जातो. राष्ट्रीय बाल पुरस्कार मिळालेल्या बालकांचं साहस अद्वितीय असून भारतीयांसाठी प्रेरणादायी असल्याचं राष्ट्रपती यावेळी बोलताना म्हणाल्या. कला, संस्कृती, साहस, नवोन्मेष, विज्ञान आणि तंत्रज्ञान, सामाजिक सेवा, क्रीडा आणि पर्यावरण अशा विविध सात श्रेणींमध्ये केलेल्या असाधारण कामगिरीबद्दल त्यांना हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. हा पुरस्कार मिळालेल्यांमध्ये मुंबईची 13 वर्षीय केया हटकर आणि अमरावतीची 17 वर्षीय करिना थापा या राज्यातल्या दोन मुलींचा समावेश आहे. केया हटकर ही डान्सिंग ऑन माय व्हील्स आणि आय एम पॉसिबल या लोकप्रिय पुस्तकांची लेखिका आहे. कला आणि संस्कृती क्षेत्रातील कामगिरीसाठी तिला या पुरस्कारानं गौरवण्यात आलं. तर अमरावतीच्या करिना थापा हिला तिनं दाखवलेल्या धाडसाबद्दल बाल पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं आहे. तिनं अतुलनीय प्रसंगावधान दाखवत आगीतून गॅस सिलेंडर बाहेर काढून 36 जणांचे प्राण वाचवले होते.

**पीएम बालदिवस**

देशाच्या युवाशक्तीमुळे आज जग भारताकडे आशेनं आणि अपेक्षेनं पाहत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल अधोरेखित केलं. नवी दिल्लीत काल वीर बाल दिनानिमित्त भारत मंडपममध्ये आयोजित कार्यक्रमाला त्यांनी संबोधित केलं. सरकारी धोरणांमध्ये तरुणांच्या सक्षमीकरणाला सर्वाधिक प्राधान्य दिलं जात असल्याचं त्यांनी सांगितलं. देशापेक्षा आणि देशहितापेक्षा कुणी मोठं नाही, अशी शिकवण वीर बाल दिवसामुळे मिळते, असंही पंतप्रधान यावेळी म्हणाले. यावेळी पंतप्रधानांच्या हस्ते सुपोषित ग्राम पंचायत योजनेचा प्रारंभ करण्यात आला. पोषण आहाराशी संबंधित सेवा सुविधा सामाजिक योगदानातून ग्रामपंचायत पातळीवर उपलब्ध करुन देणं हे या अभियानाचं उद्दिष्ट आहे. तत्पूर्वी कार्यक्रमाच्या आधी पंतप्रधानांनी वीर बालपुरस्कार विजेत्यांशी संवाद साधला. तसंच नंतर झालेल्या संचलनाला हिरवा झेंडा दाखवला आणि मानवंदना स्वीकारली. विविध राज्यांच्या पारंपरिक समृद्धीचं दर्शन घडवणाऱ्या वेशभूषा केलेल्या मुलांची पथकं आणि चित्ररथ या संचलनात सहभागी झाले होते. यामध्ये सांगली शिक्षण संस्थेच्या पथकानं महाराष्ट्राचं प्रतिनिधित्व करत लेझीम कलाप्रकाराचं प्रात्यक्षिक सादर केलं.

**मनमोहनसिंग**

माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचं काल रात्री दिल्लीत निधन झालं. ते 92 वर्षांचे होते. वयोमानामुळे गेले काही महिने त्यांची तब्येत बरी नव्हती. त्यांना काल रात्री त्रास होऊ लागल्यानं दिल्लीतील एम्स रुग्णालयात दाखल करण्यात आलं

होतं, उपचारादरम्यान, त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पार्थिवावर नवी दिल्लीत संपूर्ण शासकीय इतमामात अंत्यसंस्कार होणार आहेत. त्यांच्या निधनाबद्दल सरकारनं सात दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर केला आहे. आज होणारे सर्व सरकारी कार्यक्रम रद्द करण्यात आले असून, राष्ट्रध्वज अर्ध्यावर उतरवण्यात येणार आहे. ड़ॉ. मनमोहन सिंग यांना आदरांजली अर्पण करण्यासाठी आज सकाळी 11 वाजता केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक बोलावण्यात आली आहे. अर्थतज्ज्ञ अशी ओळख असलेले डॉक्टर मनमोहन सिंग 33 वर्षांच्या सेवेनंतर या वर्षी एप्रिलमध्ये राज्यसभेतून निवृत्त झाले. 26 सप्टेंबर 1932 रोजी अविभाजित भारतातील पंजाब प्रांतातील एका गावात जन्मलेल्या, डॉक्टर सिंग यांनी 2004 ते 2014 पर्यंत भारताचे 13 वे पंतप्रधान म्हणून काम केलं.

**<u>शोक संदेश</u>**

शैक्षणिक आणि प्रशासन या दोन्ही क्षेत्रात डॉक्टर मनमोहन सिंग यांची मोलाची कामगिरी होती, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटलं आहे. तर देशाच्या अर्थव्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान देणारे ते अर्थतज्ञ होते, असं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी म्हटलं आहे. डॉ. सिंग यांनी देशाच्या आर्थिक धोरणावर मजबूत ठसा उमटवला. जनतेचं जीवनमान सुधारण्यासाठी त्यांच्या पंतप्रधानपदाच्या कार्यकाळात त्यांनी मोठ्या प्रमाणात प्रयत्न केल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटलं आहे. देशानं एक दूरदर्शी राजकारणी आणि सचोटीचा नेता गमावला आहे, असं काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटलं आहे. डॉ. सिंग यांनी सचोटीनं देशाचं नेतृत्व केलं आणि त्यांची नम्रता आणि अर्थशास्त्राच्या सखोल जाणिवेनं राष्ट्राला प्रेरणा दिली, असं काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी म्हटलं आहे.

**<u>जयशंकर-अमेरिका</u>**

परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉ. एस जयशंकर यांनी काल रात्री वॉशिंग्टन डीसी इथं अमेरिकेचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार जेक सुलिव्हान यांची भेट घेतली. दोन्ही नेत्यांनी भारत-अमेरिकेतील धोरणात्मक भागीदारीच्या प्रगतीवर आणि सध्याच्या प्रादेशिक तसंच जागतिक घडामोडींवर चर्चा केली. डॉ. जयशंकर 24 डिसेंबरपासून सहा दिवसांच्या अमेरिकेच्या दौऱ्यावर आहेत. प्रमुख द्विपक्षीय, प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी जयशंकर अमेरिकेचे परराष्ट्र व्यवहारमंत्री आदींची भेट घेतील. या भेटीदरम्यान ते अमेरिकेतील भारताच्या महावाणिज्य दूतांच्या परिषदेचं अध्यक्षपदही भूषवणार आहेत.

**<u>रिझर्व्ह बँक-प्रगती अहवाल</u>**

देशातील बँकांच्या नफ्यात आर्थिक वर्ष 2023-24 पर्यंत सलग सहा वर्षं वाढ झाली असून, चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहामाहीतही वाढीचा कल कायम असल्याचं भारतीय रिझर्व्ह बँकेनं म्हटलं आहे. रिझर्व्ह बँकेनं देशातील बँकिंग आणि त्यातील कल याबाबतचा एक अहवाल काल प्रसिद्ध केला, त्यात ही माहिती देण्यात आली आहे. बँकांच्या मालमत्तेची गुणवत्ता सुधारत राहिली असून, एकूण अनुत्पादित कर्जांचे प्रमाण अर्थात एनपीए 13 वर्षांतील सर्वांत कमी नोंदवला गेला आहे. चालू वर्षाच्या मार्च अखेरीस एनपीए 2.7 टक्के आणि सप्टेंबरच्या अखेरीस 2.5 टक्के नोंदवला गेला आहे, असेही या अहवालात नमूद करण्यात आलं आहे. सलग तिसऱ्या वर्षी नागरी सहकारी बँकांच्या मालमत्तेची गुणवत्ता सुधारली आहे. भांडवल पर्याप्तता आणि नफाही वाढला आहे. बिगर-बँकिंग वित्तीय कंपन्यांनी कर्जवितरणात दुहेरी आकड्यात वाढ दर्शविली आहे, तर त्यांच्या एकूण थकीत कर्जांचे प्रमाण या वर्षी सप्टेंबरच्या अखेरीस 3.4 टक्क्यांपर्यंत घसरले आहे, असे रिझर्व्ह बँकेनं म्हटलं आहे.

**<u>मांडवीय-नियुक्ती पत्रे</u>**

केंद्रीय श्रम आणि रोजगार मंत्री डॉ. मनसुख मांडविय यांनी काल नवी दिल्ली इथं श्रम मंत्रालयात अंमलबजावणी अधिकारी म्हणून नियुक्त झालेल्या 34 उमेदवारांना नियुक्ती पत्रे दिली. निवड झालेल्या उमेदवारांचे अभिनंदन करून डॉ. मांडविया यांनी कामगारांच्या कल्याणासाठी परिश्रमपूर्वक काम करण्याचे आणि कामगार कायद्याच्या पालनावर लक्ष देण्याचं आवाहन केलं. त्यांनी अधिकाऱ्यांना त्यांच्या सचोटी, समर्पण आणि वचनबद्धता या मूल्यांचे पालन करण्याचं आणि कामात उच्च दर्जा राखण्याचंही आवाहन केलं. कामगारांसाठी न्याय्य आणि सर्वसमावेशक वातावरण निर्माण करण्यासाठी अधिकाऱ्यांच्या योगदानाचे महत्त्वही त्यांनी अधोरेखित केलं आणि देशाच्या प्रगतीसाठी कटिबद्ध राहण्याचं आवाहन केलं.

**<u>तटरक्षक दल</u>**

भारतीय तटरक्षक दलानं एमएसव्ही ताज धरे हराम या बुडालेल्या जहाजातून नऊ भारतीय कर्मचाऱ्यांची सुटका केली. हे जहाज पाकिस्तानच्या शोध आणि बचाव क्षेत्रात गुजरातमधील पोरबंदरच्या पश्चिमेला सुमारे 311 किलोमीटर अंतरावर बुडाले होते. गुजरातमधील मुंद्रा बंदरातून ते येमेनकडं निघाले होते, मात्र उसळलेल्या समुद्रामुळं त्यात पाणी शिरल्यानं ते बुडालं. मुंबई आणि पाकिस्तानच्या सागरी बचाव समन्वय केंद्रांनी परस्पर सहकार्यातून ही बचाव मोहीम राबवली आणि नऊ जणांचे जीव वाचवले.

**<u>बॅडमिंटन-किंग कप</u>**

जागतिक क्रमवारीत 12 व्या क्रमांकावर असलेला भारतीय बॅडमिंटनपटू लक्ष्य सेन आणि इतर सात अव्वल खेळाडू आजपासून चीनमधील शेनझेन इथं सुरू होणाऱ्या किंग कप आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन खुल्या स्पर्धेत सहभागी होणार आहेत. उपांत्यपूर्व फेरीत आज लक्ष्य सेनची लढत हाँगकाँगच्या अँगस एन जी कालाँगशी होणार आहे. सिंगापूरचा माजी जगज्जेता लोह कीन य्यू, फ्रान्सचा ॲलेक्स लॅनियर आणि चीनचे हु झे एन आणि वांग झी जून यांचाही या स्पर्धेत समावेश आहे.

**<u>क्रिकेट</u>**

ऑस्ट्रेलियातील मेलबर्न इथं सुरू असलेल्या बॉर्डर-गावस्कर करंडक कसोटी क्रिकेट मालिकेतल्या चौथ्या सामन्याच्या आज दुसऱ्या दिवशी ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावात सर्व गडी बाद 474 धावा केल्या आहेत. पाच सामन्यांच्या या मालिकेत दोन्ही संघांनी प्रत्येकी एक सामना जिंकला आहे. दरम्यान, माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करण्यासाठी भारतीय संघाचे खेळाडू दंडावर काळ्या फिती बांधून खेळत आहेत.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.